| | | |
|---|---|---|
| | **पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण**<br>पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक – पिन 422003<br>दुरध्वनी नंबर 0253-2309700<br>E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

---

**प्रेस नोट** दिनांक :०६/०७/२०२४

## नाशिक ग्रामीण पोलीस भरती २०२२- २०२३ मैदानी चाचणी पात्र उमेदवारांची दिनांक ०७/०७/२०२४ रोजी लेखी परिक्षा.

---

नाशिक ग्रामीण पोलीस दलाअंतर्गत ३२ पोलीस शिपाई पदांकरीता भरती प्रक्रिया राबविली जात असून दिनांक १९/०६/२०२४ रोजी पासून पोलीस मुख्यालय मैदान, आडगाव येथे भरती प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली होती. भरती प्रक्रियेदरम्यान दिनांक १९/०६/२०२४ ते २२/०६/२०२४ या कालावधीत उमेदवारांची मैदानी चाचणी घेण्यात आली. मैदानी चाचणी पुर्ण केलेल्या उमेदवारांना मिळालेल्या गुणांबाबत त्याचवेळी समक्ष सांगण्यात आलेले आहे. मैदानी चाचणीमधून लेखी परिक्षेसाठी पात्र झालेल्या उमेदवारांची यादी दिनांक २८/०६/२०२४ रोजी नाशिक **ग्रामीण पोलीस दलाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.**

( **https://www.nashikruralpolice.gov.in/** )

लेखी परिक्षेसाठी पात्र झालेल्या उमेदवारांची **दिनांक ०७/०७/२०२४ रोजी सकाळी ०७:०० वाजता भुजबळ नॉलेज सिटी,कॉलेज, नाशिक ग्रामीण पोलीस मुख्यालयाजवळ, आडगाव नाशिक** येथे आयोजीत करण्यात आलेली आहे. उमेदवारांनी लेखी परिक्षेचे हॉल तिकीट महाआयटी यांचे संकेतस्थळावरुन डाउनलोड करुन घ्यावे. **परिक्षेला येतांना उमेदवारांनी सोबत आधारकार्ड, हॉलतिकीट, मैदानी चाचणीसाठी दिलेले पिवळे रंगाचे प्रवेशपत्र व पासपोर्ट साईजचे दोन फोटो** घेवुन वेळेत हजर रहावे.

नाशिक ग्रामीण पोलीस दलातील पोलीस शिपाई पदांकरीता भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शक व निपक्षपातीपणे सुरू असून कोणीही उमेदवाराने कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये. कोणीही भरती संदर्भात प्रलोभन दाखवत असेल, अशा इसमाविरुध्द कारवाई करण्यात येईल असे आवाहन नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.